शासन आदेश क्रमांक-पदोन्नती -२०१२/प्र.क्र. १४२/उद्योग-४
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक ७ जानेवारी, २०१६

विषय - श्री. म. शं. गायकवाड, व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांना "उप संचालक (गट-अ), शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय या पदावर पदोन्नती देणे बाबत..

<u>संदर्भ</u>- सामान्य प्रशासन विभागाचे गोपनीय पत्र क्रमांक ईएसबी-१११५/५९/प्र.क्र. १२८/१३, दिनांक ३०/१०/२०१५

<u>शासन आदेश -</u>

श्री. म. शं. गायकवाड, व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई (गट-अ) (वेतनश्रेणी- १५६००-३९१००, ग्रेड पे ६६००/-) यांची "उप संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय (गट-अ), (वेतनश्रेणी १५६००-३९१००, ग्रेड पे ७६००/-) या पदावर खाली नमुद केलेल्या अटींवर तदर्थ तत्वावर पदोन्नती देण्यात येत आहे.

१) श्री. म. शं. गायकवाड यांना देण्यात येणारी पदोन्नती ही तदर्थ स्वरुपात आहे. पदोन्नतीचे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील असल्याने या पदावर देण्यात आलेली पदोन्नती किंवा निवडसूची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने नियमित केल्यानंतरच सदर पदावर सेवा ज्येष्ठता व अन्य सेवाविषयक लाभ मिळण्यास ते पात्र राहतील.

२) सेवा प्रवेश नियमानुसार यापूर्वी ते मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण झाले नसल्यास किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास पदोन्नतीनंतर मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण होणे किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक राहील.

३) पदोन्नत अधिकाऱ्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु नाही, याच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.

४) पदोन्नतीसाठी विचार क्षेत्रातील अधिकाऱ्याची पात्रता/अपात्रता तपासण्यात आली असून ज्येष्ठता सूचीबाबत कोणतेही प्रकरण भविष्यात उद्भवल्यास त्यामध्ये होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

५) सदर पदोन्नतीमुळे कोणत्याही न्यायालयीन निर्णयाचा अवमान होत असल्यास किंवा भविष्यात याबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.

२. श्री. म. शं. गायकवाड ज्या दिनांकास पदोन्नतीच्या पदावर रुजु होतील त्या दिनांकापासून त्यांना पदोन्नतीविषयक लाभ अनुज्ञेय होतील. त्यानुसार श्री. म. शं. गायकवाड यांनी उप संचालक पदाचा पदभार स्विकारण्यासाठी तात्काळ संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, मुंबई यांच्याकडे रुजु व्हावे.

३. श्री. म. शं. गायकवाड यांना पदोन्नती दिल्याने व्यवस्थापक (मोठी मुद्रणालये), शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई हे पद रिक्त होईल. त्यानुसार प्रशासकीय कारणास्तव श्री. रु. दी. मोरे,

व्यवस्थापक (मोठी मुद्रणालये) येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे यांची व्यवस्थापक (मोठी मुद्रणालये), शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

४. श्री. रु. दी. मोरे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या व्यवस्थापक (मोठी मुद्रणालये) येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपर्यंत श्री. नरेश महादेवराव गोटे, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याकडे देण्यात येत आहे.

५. वरीलप्रमाणे संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, मुंबई यांनी श्री. रु. दी. मोरे यांना कार्यमुक्त करण्यासंदर्भात तसेच श्री. नरेश महादेवराव गोटे यांना अतिरिक्त कार्यभार देण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०८१०४५३१४२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vaijnath Bhujangrao Latake

Digitally signed by Vaijnath Bhujangrao Latake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8502d8fbaa5d3d31358e5bf349fc0853019893b61049b2ad260bccf75c596136, cn=Vaijnath Bhujangrao Latake
Date: 2016.01.08 10:47:07 +05'30'

(वै. भू. लटके)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
३) मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
४) प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्विय सहायक
५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
६) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, (१२/१६-ब व १३), मंत्रालय, मुंबई
७) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई
८) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
९) व्यवस्थापक येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे
१०) व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१५) श्री. म. शं. गायकवाड, व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
१६) श्री. रु. दी. मोरे व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे
१७) श्री. नरेश महादेवराव गोटे, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे
१८) निवड नस्ती, उद्योग-४